# दि. ०६/०१/२०१५ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक ०६.०१.२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजीत जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती ठरल्या प्रमाणे मा. अध्यक्षा जि. प. यवतमाळ यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली, सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सर्वश्री / श्रीमती**

१. मा. सौ. आरतीताई फुपाटे, अध्यक्षा जिल्हा परिषद यवतमाळ
२. मा. श्री. सुभाषभाऊ ठोकळ, सभापती जिल्हा परिषद यवतमाळ
३. मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे, सभापती जिल्हा परिषद यवतमाळ
४. मा. सौ. लताताई खांदवे, सभापती जिल्हा परिषद यवतमाळ
५. सन्मा. सौ.संगीता ताई राठोड, सभापती पंचायत समिती दिग्रस
६. सन्मा. सौ कमलताई राठोड सदस्या जि.प. यवतमाळ
७. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
८. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
९. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद यवतमाळ
१०. मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ

**इतर आमंत्रित अधिकारी / कर्मचारी**

१. श्री. सी. आर. भवसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (न) जि.प. यवतमाळ
२. श्री. ए.एम. आडे उपकार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
३. श्री. अ.वि. लोखंडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग दारव्हा
४. श्री. ए. एस. बोबडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग राळेगाव
५. श्री. ए.टी. पदमावार उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग पांढरकवडा
६. श्री. के.एम. मानकर उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग यवतमाळ
७. श्री. डी.पी. चौधरी उपअभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग यवतमाळ
८. कु. एम.एस. गुडकवार लागवड अधिकारी यवतमाळ
९. कु. सोनाली शेंडे पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
१०. श्री. एस.टी. शेंडे शाखा अभियंता म.जी.प्रा. यवतमाळ
११. श्री. श्री. व्ही.एच. गावंडे उप का.अ. म.जी.प्रा. ना.ग्रा. यवतमाळ
१२. श्री. पी.जी. उमप म.जी.प्रा. पुसद
१३. श्री. जी.पी. घुगे म.जी.प्रा. पुसद
१४. श्री. पी.एल. मंडलीक शा.अ. सिंचन विभाग जि.प. यवतमाळ
१५. श्री. एच.एस. वाळके क.अभियंता पा.पु. उपविभाग राळेगाव

१६. श्री. कैलाश एस. मसादे म.रा.वि.वि.कं. मर्या.

१७. श्री. आ.शा. पांडे स.अ.श्रे.२ लघुसिंचन (जलसंधारण ) यवतमाळ

१८. श्री. अ.डब्लु जोशी म.रा.वि.वि.कं. मर्या.

१९. श्री. डी.व्ही. भल्मे म.रा.वि.वि.कं. मर्या. पांढरकवडा

२०. श्री. एस.आर. कवाडे क.अ. जि.प. पा.पु. उपविभाग वणी

२१. श्री. पी.एन. भलावी क.अ. जि.प. पा.पु. उपविभाग वणी

२२. श्री. ए.जी. घावडे शाखा अभियंता यवतमाळ मध्यम प्रकल्प विभाग

२३. श्री. मंगेश जोशी क.अभि. यवतमाळ पाट बधांरे विभाग

२४. श्री. पी. कुरळकर क.अभि. पा.पु. उपविभाग राळेगाव

२५. श्री. डी.बी. राठोड R.F.O. पांढरकवडा

२६. वंदना ढवळे जि.कार्यक्रम व्यवस्थापक स्व.भा. मि. यवतमाळ

२७. श्री. विश्वास वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक भ.सं.वि.यं. यवतमाळ

२८. श्री. प्र. वि. पोतदार कनिष्ठ भुवैज्ञानिक पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ

२९. श्री. पी.के. भोंग स्विय. सहा. मा. अध्यक्षा जि.प. यवतमाळ

३०. श्री. प्रशांत नगराळे स.ले.अ. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ

३१. श्री. भा.ब. पोटे तंत्र अधिकारी जि.अ.कृ.अ. यवतमाळ

३२. श्री. डी.जे. पाली शा.अ. सिंचन विभाग जि.प. यवतमाळ

३३. श्री. आर.बी.कोंबे स्विय सहा. म.व बा. सभापती जि.प. यवतमाळ

*******

सर्व प्रथम कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यवतमाळ यांचे प्रतिनिधीनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाजास खालील प्रमाणे सुरवात केली.

**विषय क्रमांक ०१ :- दिनांक ०९/१२/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत कायम करण्यास मान्यता प्रदान करणे.**

**ठराव क्रमांक ०१ :- दिनांक ०९/१२/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत कायम करण्यास ही समिती मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्रमांक ०२ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करणे बाबत कार्यवाहीचा आढावा.**

उपरोक्त विषयांचा आढावा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी सभेस विद्युत पुरवठा बाबत माहिती दिली, मौजा सिंगलदिप, खंडणी, मेंढणी हे Infra -०२ मध्ये असल्यामुळे सदर कामाचा कंत्राट पॅसेज फर्म ला कामे देण्यात आली असुन , सदर कामे दिड महिण्याच्या कालावधी

मध्ये होईल असे सांगण्यात आले. यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी विचारना केली असता असे किती नळ योजनेचे विद्युत पुरवठा जोडणी केलेली नाही याची सविस्तर गावांची नावे सभेत सांगण्यात यावी , यावर म.रा.वि.म प्रतिनिधीने गावांची यादी चे वाचन केले मौजा सिंगलदिप ता.पांढरकवढा , वाढोणा ता. पांढरकवडा, भिमकुंड ता.घाटंजी, सगदा ता. घाटंजी, रोहपट ता. मारेगाव, उमरविर ता.राळेगाव, पिंपळखुटी ता.पांढरकवढा, रामपुर ता.झरी, बोरीवन ता.उमरखेड, भुलाई ता.दारव्हा, सोनेगाव ता.राळेगाव,अंजी ता.राळेगाव डिमांड भरण्यात आलेली आहेत, विघुत जोडणी मागणी केली आहेत सर्व कनेक्शन Infra-२ मध्ये कामे घेण्यात आली आहेत व ती कामे लवकरच करण्यात येणार असे प्रतिनिधीने सांगीतले.

**विषय क्रमांक ०३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

मा.अध्यक्ष यांनी आढावा सभेत मारेगाव येथील कामाची विचारणा केली असता म.जि.प्रा चे उपविभागीय अभियंता यांनी मारेगाव येथील कामे चालु केलेली आहेत सद्यास्थितीत जलशुध्दीकरण केन्द्राचे कामे प्रगतीपथावर आहेत तसेच मार्च २०१५ पर्यंत पाणी पुरवठा कामे पुर्ण होतील. असे सांगीतले मा.अध्यक्ष यांनी हर्षी बालवाडी येथील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेबाबत विचारणा केली,सदर गावास दरवर्षी टॅंकर लागत असल्याबाबत सांगीतले, त्यावर म.जि.प्रा याबाबत त्वरित कार्यवाही करावी असे निर्देश कार्यकारी अभियंता म.जि.प्रा ला दिले.

उपकार्यकारी अभियंता यांनी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१४-१५ प्राप्त प्रस्तावाची यादी समिती समोर वाचून दाखवली त्यामध्ये मा.अध्यक्ष यांनी जास्तीत जास्त गावे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१४-१५ मध्ये घ्यावे असे सांगीतले व नस्तीप्रमाणे यादीसह मान्यता दिली.

स्वच्छता विभागाने (NBA) प्रस्तावित गावे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१४-१५ मधील गावे हागदरीमुक्तबाबत यादी प्रमाणीत करुन देण्यात यावी व तसेच प्रमाणीत यादी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला सादर करण्यात यावी. त्यानंतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत स्त्रोत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे त्यांचे प्रस्ताव तयार करणे अंदाजपत्रक तयार करणे या कामाला विलंब लागत आहेत , पाणी पुरवठा विभागाकडे गेल्या सहा महिन्यात सहायक भुवैज्ञानिक सेवा निवृत्त झाल्यामुळे बरीच कामे प्रलंबित आहे, या बाबत वरिष्ठ भुवैज्ञानिक यांच्या मार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे सर्वेक्षण होणेबाबत वारंवार पाठपूरावा करण्यात आला, परंतु वरिष्ट भुवैज्ञानिक यांच्या मार्फत स्त्रोत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात आली नाहि. त्यामुळे वरिष्ट भुवैज्ञानिक यांनी पाहणी करुन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमचे सर्व स्त्रोत प्रमाणपत्र त्वरित देण्याचे निर्देश देण्यात आले. ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत ७० गावाची यादी मार्च-एप्रिल १४ मध्ये पाठविली होती, त्याला त्वरित स्त्रोत प्रमाणपत्र देण्यात यावे व या वर्षीच्या सर्व गावांना स्त्रोत प्रमाणपत्र त्वरित देण्यात यावे असे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश दिले, डोंगरखर्डा,सावंगी ता.मारेगाव, करळगाव, उमरी ता.बाभुळगाव, सावरगाव

ता.नेर येथील स्त्रोत प्रमाणपत्र अघापही अप्राप्त आहे. चिंचमंडल ता.मारेगाव येथील स्त्रोताच्या बाबतीत सविस्तर चर्चा झाली वरिष्ट भुवैज्ञानिक यांनी त्यांचा अहवाल लेखी स्वरुपात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा असे निर्देश दिले वरिष्ट भुवैज्ञानिक तांत्रीक दृष्टया जुना दिलेला स्त्रोत योग्य असल्याचा सांगीतले , सावंगी ता.मारेगाव येथे वरिष्ट भुवैज्ञानिक यांनी दोन विंधन विहीर घेण्याचे प्रस्तावित केले आहेत. स्थळ निश्चिती करुन प्रमाण पत्र अघाप दिलेले नाहि वरिल बाबत त्वरित अहवाल देण्याचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले.

**विषय क्रमांक ०४ :- स्वच्छ भारत मिशन ( ग्रामीण ) अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीचे संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा पुढील प्रमाणे सादर केला.

सन २०१४-१५ मध्ये जिल्हयाला वैयक्तीक शौचालयाचे २२६८५ एवढे एकूण उदिष्ट आहे. त्यापैकी APL चे १४१७४ व BPL चे ८५११ एवढे उदिष्ट आहे. माहे सप्टेंबर २०१४ अखेर पर्यंत APL चे ४७५६ एवढे बांधकाम झाले आहे, तर BPL चे २२४३ असे एकूण ६९९९ एवढे व्यैक्तीक शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन एकूण ३१ % काम पुर्ण झाले असल्याची माहिती दिली. माहे डिसेंबर २०१४ ची माहिती एक किंवा दोन दिवासत समाविष्ट करण्यात येईल या दरम्यान मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेत सुचीत केले की प्रत्येक जिल्हा परिषद सदस्य,सदस्या यांना एक गाव MODEL म्हणुन गाव देण्यात येईल या बाबत ०९/०१/२०१५ मध्यल्या सभेत गाव निश्चीती करण्यात येईल माळअसोली हे गाव श्री.ययाती नाईक जि.प सदस्य यांनी घेतलेला आहेत. तसेच सौ.लताई खांदवे सभापती जिल्हा परिषद यवतमाळ यांनी वडगाव ग्रामपंचायत MODEL घेणेबाबत कळविण्यात आले.

**विषय क्रमांक ०५ :- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे विहीरीचे कामे प्रशासकीय मान्यता ७२७६ त्यापैकी पुर्ण झालेली कामे १८५३ सुरु झालेली कामे ३५९२ खर्च ४३ कोटी २० लक्ष येवढी झालेली आहेत.

**विषय क्रमांक ०६ :- ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

**सन २०१३-१४ वार्षिक कृती आराखडयामधील उदिष्ठीत ९५ गांवे व बिगर उदिष्ठीत ८२ गांवाबाबत उपविभाग / तालुका निहाय माहितीचा गोषवारा**

| उपविभागाचे नांव | तालुका | २०१३-१४ ( Target) | | २०१३-१४ ( Non-Target) | | प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर प्राकलन | सुरु केलेली कामे | मंजुर प्राकलन | सुरु केलेली कामे | |
| **दारव्हा** | दारव्हा | १ | १ | ६ | ६ | ३ |
| | नेर | २ | २ | ९ | ८ | ७ |
| एकूण | | **३** | **३** | **१५** | **१४** | **१०** |
| **पांढरकवढा** | पांढरकवढा | १ | १ | ३ | ३ | १ |
| | घाटंजी | ६ | ६ | ३ | २ | १ |
| एकूण | | **७** | **७** | **६** | **५** | **२** |
| **यवतमाळ** | यवतमाळ | ४ | ४ | १४ | १४ | १२ |
| | आर्णी | १३ | १३ | ३ | ३ | १ |
| | बाभुळगाव | १ | १ | ९ | ८ | २ |
| एकूण | | **१८** | **१८** | **२६** | **२५** | **१५** |
| **राळेगाव** | राळेगाव | २ | २ | ५ | ५ | ० |
| | कळंब | २ | २ | ११ | १० | ६ |
| एकूण | | **४** | **४** | **१६** | **१५** | **६** |
| **वणी** | वणी | १ | १ | ४ | ४ | ० |
| | मारेगाव | ५ | ५ | ५ | ४ | ० |
| | झरी | ४ | ४ | २ | २ | १ |
| पुसद | पुसद | २ | २ | १ | १ | १ |
| | दिग्रस | २ | २ | ४ | ४ | ४ |
| | उमरखेड | ० | ० | १ | १ | १ |
| | महागाव | ० | ० | २ | २ | २ |
| एकूण | | **४** | **४** | **८** | **८** | **८** |
| | | | | | | |
| एकूण | | **१०** | **१०** | **११** | **१०** | **१** |
| **जिल्हयाचे एकूण** | | **४६** | **४६** | **८२** | **७७** | **४२** |

सर्व प्रथम उपविभागीय अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा **उपविभाग यवतमाळ** यांचा आढावा सविस्तर पणे घेण्यात आला **वडगाव पोलिसस्टेशन** सदर गावाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४५.८५ लक्ष असुन विहीरीचे कामू पूर्ण , पुढील कामास समिती कडून प्रतिसाद नाही, अद्यापही दुस-या हप्त्याचा परिपूर्ण प्रस्ताव अप्राप्त आहेत, त्यामुळे विहिरीचे कामे करुन घ्यावे असे उपविभागीय अभियंता यांनी सांगीतले तसेच **आकोलाबाजार, बाराडतांडा,भिसनी, हातगाव, सालोड, मांजरडा, उमरठा , बाभुळगाव तालुक्यामधील, सावर असे उपविभागा यवतमाळ** सात गावामध्ये मुल्याकना पेक्षा जास्त निधी काढलेला आहेत व कामे रखडलेली आहेत यावर सविस्तर चर्चा झाली. उपअभियंता यांनी सदर गावामध्ये दिलेला निधी समितीने केलेला खर्च त्यांच्या कामाचे मुल्याकन याबाबतचा सविस्तर तांत्रीक अहवाल त्वरित सादर करावा, जेथे तांत्रीक सेवा पुरवठादार (TSP) सहकार्य करत नसेल शाखा अभियंता, उपविभागीय अभियंता यांनी मुल्याकन करुन जास्तीच्या रक्कम काढल्याबाबत खात्री करुन तांत्रीक अहवाल सादर करावा त्या प्रमाणे संबंधीत गट विकास अधिकारी यांना आदेशित करुन गट विकास अधिकारी यांनी योजनेची दप्तर तपासणी करावी संबंधीत दोषीना त्वरित कार्यवाही करण्यात यावी, तसेच हिशोब सादर करुन जे-जे दोषी असतील त्यांच्यावर वसुलीची / गुन्हे दाखल करण्याचे कार्यवाही करावी असे निर्देश मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.अध्यक्ष यांनी दिले अशाच प्रकारे **पुसद उपविभागातील राजना,शिवाजीनगर** व तसेच **सालोड, क्रिष्णापूर , पांढरकवढा** येथील **तिवसाळा, आकोलीखुर्द** गावाबाबत सुध्दा वरिल प्रमाणे कार्यवाहि करण्याचे निर्देश देण्यात आले.

मा.मु.का.अ यांनी टंचाई अंतर्गत मंजुर आराखडयानुसार विशेष दुरुस्ती व तसेच ता.पु नळ योजनांचे प्राकलन तयार करणे संबंधीनिर्देश दिले असता त्यावर उपअभियंता यांनी वाहन उपलब्ध करुन दिल्यासच प्राकलने तात्काळ सादर करता येईल वाहना अभावी सर्वच कामाची गती मंदावलेली असल्याबाबत उपअभियंता यांनी मा.मु.का.अ यांच्या निदर्शनास आनुन दिले. सदर सभेस २% व ५ % अंदाजपत्रके ,आराखडे व सर्वेक्षण तरतुद लेखाशिर्ष अंतर्गत जलव्यवस्थापन सभेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजुरी घ्यावी.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत स्त्रोत प्रमाणे पत्र उपलब्ध झाल्यावरही गावक-यांनी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत, वारंवार पाठपूरावा करुन हि गावक-या कडून प्रतिसाद होत नसने तसेच दोन वर्षा पासून वरीलबाबतीत पूढील कार्यवाहि न होणे गावामध्ये इतर उपलब्ध साधना वरुन व्यवस्थीत पाणी चालु असने त्यामूळे समितीची उदासिनता शौचालयाच्या अटी मध्ये सदर गावे न बसने त्यामुळे सदर गावाचे प्रस्ताव तसेच मागणी प्रस्ताव सादर न केल्यामुळे शासनाच्या निर्देशाप्रमाणे व मा.अधिक्षक अभियंता यांच्या सुचनेनुसार अशा गावांना आराखडयातुन वगळून पूढच्या वर्षी नव्याने प्रस्ताव घेऊन कार्यवाहि करावी.

**त्यानंतर राळेगाव उपविभागाचा आढावा** राळेगाव उपविभागाअंतर्गत कळंब तालुक्यातील **बेलोरी** हे गाव उदभवाचे बळकटीकरण GSDA यांनी सुचविले आहेत. व ते काम वरिष्ट भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विभाग यवतमाळ कार्यालयाने त्याच्या Sustainability Programme मधुन हाताळावे स्त्रोत बळकटीकरण झाल्यावर त्या स्त्रोता वरुन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत गावास योजना घेता येईल.

## मा.अध्यक्ष जि. यवतमाळ यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

**विषय क्रमांक ०८ :- मौजा पहुर ईजारा ता.कळंब येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस मंजुरात मिळणेबाबत**

कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद यवतमाळ यांनी मौजा पहुर इंजारा ता.कळंब येथील ग्रामीण नळ पाणी पुरवटा योजनेचे सुधारीत प्राकलनांस रुपये ५६,०६,३०० /- यास प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत व तसेच मौजा तेंडोळी ता.आर्णी येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस रुपये ४२,३२,८०० /- यास प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत प्रस्ताव सभे पुढे सादर केला.

***ठराव क्रमांक ०१ :-* मौजा पहुर ईजारा ता.कळंब येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस रुपये ५६,०६,३०० /- यास ही समिती मंजुरात प्रदान करते**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ०९ :- :- मौजा तेंडोळी ता.आर्णी येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस मंजुरात मिळणेबाबत.**

**ठराव क्रमांक ०३ :-** **मौजा तेंडोळी ता.आर्णी येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस ही समिती मंजुरात प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला**

शेवटी सर्व चर्चेनंतर उपस्थिांनी सभेचे कामकाजात दिलेल्या सहकार्याबाबत मा. कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद यवतमाळ यांनी उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्ष व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अनुमतीने सभेच कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सदस्य सचिव**
जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती
तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ

**डॉ.सौ.आरती फुपाटे**
अध्यक्ष
जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती
जिल्हा परिषद यवतमाळ